**पावसाळयात उद्‌भवणाऱ्या**
**जलजन्य साथरोगांच्या उद्रेकाबाबत**
**करावयाची उपाययोजना**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक, क्र. डब्ल्यूक्यूएम-२००५/प्र.क्र.-४२/पापु-१२,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक:- ८ जून, २००५**

**संदर्भ:-** १) शासन परिपत्रक क्र. डब्ल्यूक्यूएम २००५/प्र.क्र.४२/पापु-१२, दि. १० मे, २००५

**परिपत्रक**

संदर्भिय परिपत्रकान्वये पावसाळयात उद्‌भवणाऱ्या जलजन्य साथरोगांच्या उद्रेकावर करावयाच्या उपाययोजनांबाबत क्षेत्रिय कार्यालयांना आवश्यक ते निर्देश दिलेले आहेत. तरीसुध्दा शुध्द पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या दृष्टीने खालील बाबींची विशेष दक्षता घेण्याबाबत पुन्हा निर्देश देण्यात येत आहेत.

१) पिण्यासाठी पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे क्लोरीन / ब्लिचिंग पावडर इत्यादी वापरून नियमित व प्रमाणित शुध्दीकरण करणे.
२) पिण्याच्या पाण्याच्या साठविण्याच्या ठिकाणी सुरक्षित बांधणी करून त्यात दुषित पाणी न मिसळण्याची खबरदारी घेणे.
३) कुपनलिकांच्या पाण्यांचे निर्जंतुकीकरण, देखभाल व भोवतालची स्वच्छता करणे.
४) जलवाहिन्या, नळ कनेक्शन गटारातून जाणार नाहीत, याची खात्री करणे.
५) जलवाहिन्यात होणारी गळती वेळेच्यावेळी शोधून त्वरीत दुरूस्त करणे.
६) पिण्यासाठी पुरविण्यात येणाऱ्या पाण्याची गुणवत्ता पाहण्यासाठी पाणी नमुन्याची नियमित अणुजीव शास्त्रीय तपासणी करणे व अहवालानुसार योग्य ती कार्यवाही करणे.
७) जलजन्य रोगांचे सर्व्हेक्षण करुन साथरोगांचा प्रादुर्भाव कोठे होण्याची शक्यता आहे ते पाहून संभाव्य साथीचा उद्रेक होणार नाही, याबद्दल उपाययोजना करणे.
८) साथरोगासंबंधीत त्वरीत औषधोपचार उपलब्ध करून देण्यासाठी पुरेसा औषधी साठा सर्व रूग्णालयात उपलब्ध असणे.
९) विविध माध्यमांद्वारे जलजन्य साथरोग टाळण्यासाठी आरोग्य शिक्षण देणे.

२. वरील सर्व बाबींवर लक्ष केंद्रीत करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पाठवावा.

**(राजेंद्र सुर्वे)**
**उप सचिव,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

083

**प्रति,**

१) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) मुंबई महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई
४) महासंचालक (आरोग्य सेवा), आरोग्य संचालनालय, मुंबई.
५) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
६) विभागीय आयुक्त (सर्व)
७) जिल्हाधिकारी (सर्व)
८) उपसंचालक (आरोग्य सेवा), राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे.
९) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
११) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२) मुख्याधिकारी, नगरपालिका (सर्व)
१३) सर्व पर्यवेक्षीय अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) सर्व कार्यासने, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) निवड नस्ती, का.क्र. पा.पु. १२.